जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 DEC 2024
पुढारी

# शिवाजी विद्यापीठात उद्यापासून ग्रंथ प्रदर्शन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' उपक्रमांतर्गत शिवाजी विद्यापीठ बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्रोत केंद्राच्या वतीने दि. ३० व ३१ डिसेंबर रोजी 'ग्रंथप्रदर्शन' आयोजित केले आहे. ग्रंथप्रदर्शनाचे उद्घाटन सोमवारी (दि. ३०) रोजी सकाळी ११ वाजता कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते व प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या उपस्थितीत होणार आहे.

ग्रंथ प्रदर्शन सकाळी १०.३० ते सायंकाळी ६ पर्यंत सुरू राहील. यानिमित्त ३० डिसेंबर ते १५ जानेवारी पर्यंत दुर्मीळ ग्रंथांचे प्रदर्शन भरविण्यात आले आहे. दि. १ ते १५ जानेवारी या कालावधीत सर्व वाचक, नागरिकांना बॅ. खर्डेकर ज्ञान स्रोत केंद्रातील वाचन साहित्य विनामूल्य वाचनाकरिता उपलब्ध असेल. दि. १६ रोजी दीक्षांत समारंभाचे औचित्य साधून ग्रंथप्रदर्शन व विक्री व दि. १७ रोजी ग्रंथदिंडी निघेल. कार्यक्रमात सहभागी होण्याचे आवाहन बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्रोत केंद्राचे प्रभारी संचालक डॉ. धनंजय सुतार यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 DEC 2024
लोकमत

# शिवाजी विद्यापीठात उद्यापासून ग्रंथप्रदर्शन

कोल्हापूर : 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' उपक्रमांतर्गत शिवाजी विद्यापीठातील बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्रोत केंद्रात ३० व ३१ डिसेंबर रोजी 'ग्रंथप्रदर्शन' आयोजित करण्यात आले आहे. ग्रंथप्रदर्शनाचे उद्घाटन उद्या, सोमवारी सकाळी ११:०० वाजता कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते व प्र.कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे. ग्रंथप्रदर्शनाची वेळ सकाळी १०:३० ते सायं ६ पर्यंत असणार आहे. या निमित्ताने ३० डिसेंबर २०२४ ते १५ जानेवारी, २०२५ पर्यंत ज्ञान स्रोत केंद्राच्या दुर्मीळ ग्रंथ विभागामध्ये दुर्मीळ ग्रंथाचे प्रदर्शन सर्वांना खुले असेल.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 DEC 2024
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठात उद्या ग्रंथप्रदर्शन

**कोल्हापूर :** विद्यापीठे, महाविद्यालये व सार्वजनिक ग्रंथालयामध्ये 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' हा उपक्रम राबवला जाणार आहे. बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्रोत केंद्रातर्फे उद्या (दि. ३०) सकाळी ११ वाजता ग्रंथप्रदर्शनाचे उदघाटन होणार आहे. या प्रदर्शनात दुर्मिळ ग्रंथाचे प्रदर्शन होणार आहे. वाचन संकल्प महाराष्ट्राचा साजरा करण्याच्या दृष्टिने १ जानेवारी ते १५ जानेवारी या कालावधीत सर्व वाचकांना व नागरिकांना बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्रोत केंद्रातील वाचन साहित्य विनामुल्य वाचनाकरिता उपलब्ध असेल. तसेच १६ जानेवारी रोजी  दीक्षांत समारंभाचे औचित्य साधून ग्रंथप्रदर्शन व विक्री.  १७ जानेवारी २०२५ रोजी ग्रंथदिंडी आयोजित केलेली आहे. सर्वांनी यामध्ये सहभागी होऊन वाचनसंस्कृती वृद्धिंगत करावी व वाचन पंधरवड्यातील सुविधांचा लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. धनंजय सुतार यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 DEC 2024
सकाळ

# विद्यापीठात 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' उपक्रमाचे आयोजन

कोल्हापूर : 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या उपक्रमाअंतर्गत शिवाजी विद्यापीठातील बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्रातर्फे ३०, ३१ डिसेंबरला ग्रंथ प्रदर्शन आयोजित केले आहे. ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन सोमवारी (ता. ३०) सकाळी ११ वाजता कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते, प्रभारी कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, इतर पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत होणार आहे. ग्रंथ प्रदर्शनाची वेळ सकाळी १०.३० ते सायंकाळी सहापर्यंत असेल. यानिमित्त ३० डिसेंबर ते १५ जानेवारीपर्यंत ज्ञानस्रोत केंद्राच्या दुर्मीळ ग्रंथ विभागामध्ये दुर्मीळ ग्रंथांचे प्रदर्शन सर्वांना खुले असेल. ज्ञानस्रोत केंद्रातील वाचन साहित्य विनामूल्य वाचनाकरिता उपलब्ध असेल. १६ जानेवारीला दीक्षांत समारंभानिमित्त ग्रंथ प्रदर्शन, विक्री तसेच १७ जानेवारी रोजी ग्रंथदिंडी होईल. या उपक्रमात सर्वांनी सहभागी व्हावे, असे आवाहन प्रभारी संचालक डॉ. धनंजय सुतार यांनी केले आहे.